महामार्ग पोलीस मदत केंद्र मलकापूर यांच्यातर्फे रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५ चे आयोजन >> पान 2

शेतकरी, युवकांना मिळणार ड्रोन प्रशिक्षणाची संधी >> पान 3

केस गळती प्रकरण; बाधीत गावांतील पाणी पिण्यास, वापरण्यास अयोग्य >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



युझवेंद्र चहलसोबतच्या घटस्फोटावर अखेर धनश्री वर्मा बोललीच

आतील पान

सुविचार

आत्मपरीक्षण केल्यास अहंकार नाहीसा होतो.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 149 ■ शुक्रवार, दि. 10 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य द्यावे- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील मृद व जलसंधारणांतर्गत माथा ते पायथा तत्त्वावर पाणलोटाचा विकास करावा तसेच जलयुक्त शिवार अभियान ३.०, तलाव दुरुस्ती योजना यासह विभागातंर्गत राबविण्यात येणा-या नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत, आगामी शंभर दिवसात पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.**



मंत्रालयात मृद व जलसंधारण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य सचिव (वित्त) विभाग ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना, आदर्शगाव योजना, नवीन जलसंधारण प्रकल्पांची उभारणी व प्रगतीपथावरील प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्पांचे परीक्षण व दुरुस्ती, माजी मालगुजरी तलावांचे पुनरूज्जीवन व दुरुस्ती कार्यक्रम या योजनांमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामांना गती द्यावी. भविष्यकालीन योजनांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करून त्याला मान्यता घ्यावी. राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यावर भर देवून त्यासाठी योग्य ते नियोजन करा, विभागातील प्रलंबित कामांचा जलद निपटारा करा, पदभरती, विभागातील उपलब्ध मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

### गाळ काढण्याची कामे मार्च पूर्वी पूर्ण करावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यातील गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत धरणातील गाळ काढून तोच गाळ शेतीसाठी वापरण्याच्या कामांना प्राधान्य देवून मार्च पर्यंत ही कामे तातडीने पूर्ण करावी. बऱ्याच ठिकाणी गाळ काढल्यानंतर धरणांची पाणी साठवण्याची क्षमता वाढत आहे तरी आतापासून ही कामे गतीने केल्यास मार्च अखेर मोठ्या प्रमाणात राज्यातील धरणातील गाळ काढण्याची कामे पूर्ण होतील अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केल्या.

### पराभवानंतरही अशोक पवारांच्या अडचणी कमी होईनात, अजितदादा घोडगंगा कारखान्याबाबत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुण्यात आहेत. पुण्यातील साखर संकुल येथे काही सहकार मंत्री बाबासाहेब पाटीलही यांच्यासोबत अजित पवारांची बैठक पार पडली आहे. साखर आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व प्रादेशिक कार्यालयाचे कामकाजाचा अजित पवार यांनी आज (गुरूवारी) आढावा घेतला आहे. अजित पवार यांनी हवेली तालुक्यातील दोन साखर कारखाण्याबाबत देखील बैठका घेतल्या आहेत.

हवेली तालुक्यातील दोन्ही साखर कारखाने सुरू करण्यासाठी अजित पवारांनी बैठका घेतल्याची माहिती आहे. माजी आमदार अशोक पवार यांच्याकडे असलेल्या घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचा देखील समावेश आहे. तर दुसरा थेऊर येथील साखर कारखान्याबाबत बैठक पार पडल्याची माहिती आहे. शरद पवार गटाचे माजी आमदार अशोक पवारांच्या कारखान्यावर अजितदादाची प्रशासक नेमण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. अजित पवारांनी शिरूरच्या घोडगंगा सहकारी कारखान्याची बैठक लावली होती. माजी आमदार अशोक पवार यांची सत्ता असलेला घोडगंगा कारखाना अजूनही बंद आहे. कारखाना चालू करण्यासाठी विरोधी गट आक्रमक आहेत. माजी आमदार अशोक पवार यांचा मुलगा सध्या कारखान्याचा चेअरमन आहे. यावेळी बैठकीला अजित पवार गटाचे आमदार माऊली कटकेही उपस्थित होते.

## टीएमसी, सपानंतर ठाकरेंच्या शिवसेनेनेही सोडला काँग्रेसचा हात

दैनिक आपला विदर्भ

### दिल्ली निवडणुकीत ‘आप’ला जाहीर केला पाठिंबा



**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकी २०२४ मध्ये महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर महाविकास आघाडीमधील घटक पक्ष काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्यात सर्वकाही अलबेल नसल्याचं दिसून येत आहे. कारण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने गुरूवारी ५ फेब्रुवारी रोजी होर्णाया दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसऐवजी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार अनिल देसाई यांनी दिल्लीत माध्यमांशी बोलताना यामागचे कारण सांगितले आहे. ते म्हणाले की, अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आपने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) पक्षाला पाठिंबा दिला होता, त्यामुळे त्यांचा पक्ष आपला पाठिंबा देईल.

आम आदमी पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेस हे विरोधाकांच्या इंडिया आघाडीमधील सहकारी पक्ष आहेत. पण दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस स्वतंत्रपणे लढच आहेत. २०२४ ची लोकसभा निवडणूक या दोन्ही पक्षांनी एकत्र येत लढली होती.

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप पक्षाला पाठिंबा जाहीर केल्याच्या एका दिवसानंतर लगेच शिवसनेना(उद्धव ठाकरे) पक्षाने देखील आपला पाठिंबा जाहीर केला आहे. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात इंडिया आघाडीतील आणखी एक सहकारी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी देखील दिल्ली निवडणुकीत त्यांचा पक्ष आपच्या पाठीशी असेल असे जाहीर केले होते.

दरम्यान शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी इंडिया आघाडी ही लोकसभेसाठी तयार करण्यात आली होती आणि प्रत्येक निवडणुकीत युती म्हणून त्याचा विचार केला पाहिजे असे म्हटले आहे. राऊत म्हणाले की, ''आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत. आम्ही सातत्याने सांगत आलो आहोत की काँग्रेस देशातील मोठा पक्ष आहे पण आप हा दिल्लीतील मोठा पक्ष आहे. दिल्लीत आपकडे जास्त ताकद आहे. दिल्लीतील वातवरण असं आहे की आप मोठ्या फरकाने निवडणुका जिंकत आहे. अरविंद केजरीवाल यांच्यासारख्या नेत्याला काँग्रेस देशद्रोही म्हणते याचे आमच्या पक्षाला दु:ख आहे. त्यांच्या विरोधात अशी मोहीम चालवणे चांगले नाही आणि आम्हाला ते मान्य नाही''.

''महाराष्ट्र विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत आम्ही काँग्रेसबरोबर होतो. आप देखील आमचा सहकारी आहे. दोघांनीही प्रचारात सम तोल राखला पाहिजे. आमच्यासारखे अनेक पक्ष दिल्लीत काय करायचे या द्विधा मनस्थितीत आहेत. आमचे दोन्ही पक्षांशी चांगले संबंध आहेत'', असेही राऊत पुढे बोलताना म्हणाले.

## पुणे ते सोलापूर आता फक्त सव्वातीन तासात

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे-सोलापूर दरम्यानचा रेल्वे प्रवास आता अधिक वेगात होणार आहे. या रेल्वे मार्गावरील पटरी आणि इतर कामे पूर्ण झाली आहेत, त्यामुळे एक्सप्रेस गाड्यांचा वेग वाढला आहे. रेल्वेच्या वाढलेल्या वेगाने सोलापूरहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता पुण्यात अवघ्या सव्वातीन तासात पोहोचता येणार आहे. यामुळे रेल्वे प्रवास ३५ ते ४० मिनिटांनी कमी होणार आहे. जवळपास ८८ एक्सप्रेस रेल्वेचा वेग आता ११० वरून १३० इतका झाला असल्याची माहिती आहे. पुणे-दौंड-सोलापूर सेक्शनवर गाड्यांचा वेग वाढवण्यासाठी रेल्वेकडून पायाभूत सुविधांच्या सुधारणांची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. काही कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये ट्रॅक सुधारणा, ओव्हर हेड इक्विपमेंट रेग्युलेशन, सिग्नलिंग कामे आणि इतर तांत्रिक कामांचा समावेश आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या कामांमुळे दौंड-सोलापूर-वाडी सेक्शनवर (३४१.८० किमी) अप आणि डाऊन मार्गावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांचा वेग ११० किमी प्रतितास वरून १३० किमी प्रतितास पर्यत वाढला आहे.

## पक्ष वगैरे न बघता दोषीवर कारवाई केली जाईल!

दैनिक आपला विदर्भ

### उपमुख्यमंत्री अजित पवार : बीड हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया

**पुणे/प्रतिनिधी :** बीड सरपंच हत्या प्रकरणात पक्ष वगैरे न बघता जो कुणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. गुरुवार, ९ जानेवारी रोजी त्यांनी पुण्यात माध्यमांशी संवाद साधला.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, बीड प्रकरणाची आज एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन चौकशी सुरु आहे. आता या तीन वेगवेगळ्या एजन्सी तिथे चौकशी करत आहेत. तसेच ही चौकशी करत असताना जो कुणी दोषी असेल, जो कुणी या प्रकरणाशी संबंधित असेल ते सिद्ध झाल्यास त्याच्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल, असे स्वत: राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. यासंदर्भात मीदेखील देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली आहे. यात पक्ष वगैरे न बघता जर कुणी वरिष्ठ पातळीवर काम करणारे व्यक्ती दोषी असतील तर कुणाचीही गय करण्याचे कारण नाही, असेही मी त्यांना सांगितले आहे. त्यामुळे चौकशी सुरु आहे.



काही आरोपी मिळण्यास थोडा विलंब झाला. प्रत्येकाची चौकशी करून कुणाकुणाला फोन झाले, किती काळ झाले, काय संभाषण झाले हे सर्व आता समजते आहे. या सगळ्याचा अतिशय बारकाईने तपास सुरु आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना आम्ही खपवून घेणार नाही. ही निर्घृणपणे झालेली हत्या आहे. सरकारने यात तितक्याच गांभीर्याने लक्ष दिले आहे, असेही ते म्हणाले.

संविधानाने विरोधी पक्षातील नेत्यांना किंवा सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींना बोलण्याचा अधिकार दिला आहे. पण कुणावरही अन्याय होऊ नये हीसुद्धा खबरदारी घ्यावी लागते. या प्रकरणात दोषीला पाठीशी घालणार नाही. त्यांना कडक शिक्षा देण्यात येईल आणि एक वेगळा संदेश महाराष्ट्रात दिला जाईल. नुसते आरोप करण्यापेक्षा तुमच्याकडे असलेले पुरावे एसआयटी आणि सीआयडीला द्या. कारण पुराव्याशिवाय कुणावरही आरोप करणे योग्य नाही. याबद्दल माझी देवेंद्रजींशी आणि बावनकुळे साहेबांशीही चर्चा झाली आहे. या प्रकरणाचा तीन एजन्सी तपास करत आहे. देशाने आणि राज्याने याची गंभीरतेने नोंद घेतली आहे. यात अजिबात कुणालाही मोकळे सोडले जाणार नाही. फक्त त्यांचे पुरावे, फोनवर झालेले संभाषण आणि आरोपींना हे दुष्कृत्य करायला कुणी सांगितले याचे पुरावे हवेत, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## ड्रोन प्रणालीमुळे सागरी सुरक्षा होणार भक्कम – मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी तसेच घुसखोरी रोखण्यासाठी ड्रोनद्वारे देखरेख विशेष प्रणाली सुरु करण्यात आली आहे. या ड्रोन प्रणालीमुळे राज्यातील ७ जिल्ह्यातील ९ सागर किनाऱ्यांची सुरक्षा आणखी मजबूत होणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. मत्स्य आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे यांच्या हस्ते ड्रोन देखरेख प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचा पहिला १०० दिवसांचा आराखडा तयार केला असल्याचे सांगून मंत्री श्री. राणे म्हणाले की, ड्रोन यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या ७२० किलोमिटर लांबीच्या सागरी किनाऱ्यावरून राज्याच्या १२ मैल सागरी हद्दीपर्यंत बेकायदा मासेमारी करणाऱ्या अवैध नौकांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. अशा अनधिकृत नौकांची माहिती घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी ड्रोन वेब सोल्युशन्स स्ट्रिमिंगचा पुरावा म्हणून वापर केला जाणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला चाप बसणार आहे. ड्रोन यंत्रणेमुळे राज्यातील सागरीक्षेत्र हे कॅमेऱ्याच्या नियंत्रणात येणार आहे. त्यामुळे अवैध मासेमारीला आळा घालणे शक्य होणार आहे.

श्री. राणे म्हणाले, बाहेरून येणाऱ्या ट्रॉलर्स, मोठ्या बोटी, यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठे नुकसान होते. स्थानिकाच्या उत्पन्नात घट होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होतो. त्यावर नियंत्रण मिळावे, जरब बसावी यासाठी आधुनिक तंत्र प्रणालीच्या माध्यमातून सकारात्मक पाऊल उचलण्याच्या दृष्टीने मत्स्य व्यवसाय विभागाने ड्रोन च्या माध्यमातून पहिले पाऊल टाकले आहे. ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून वापरण्यात येणार असल्याने सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वेग जास्त असल्याने एकाचवेळी अधिक क्षेत्र ड्रोनच्या देखरेखाली येणार आहे. एका दिवसात १२० सागरी मैलाचे सर्वेक्षण करण्यात येईल. तसेच एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणे बंधनकारक असेल. ड्रोनमधून प्राप्त झालेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध करून दिली जाईल. मेक इन इंडिया अंतर्गत हे ड्रोन विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून समुद्रात होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून अवैधरित्या मासेमारी करणाऱ्यावर कारवाई करून जास्तीत जास्त दंड आकारला जाणार आहे. या ड्रोनच्या माध्यमातून छायाचित्रे उपलब्ध होणार आहेत. हे सर्व पुरावे विभागास प्राप्त होऊन कारवाई करण्यास गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले.

केंद्र व राज्य सरकारच्या मत्स्य व्यवसाय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.राणे यांनी सांगितले. समुद्रकिनारा लाभलेल्या राज्यापैकी ड्रोनद्वारे देखरेख प्रणाली विकसित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी ड्रोनद्वारे देखरेख प्रणालीचे प्रात्यक्षिक झाले. यासाठी मत्स्य आयुक्त कार्यालय येथे कंट्रोल रूम उभारण्यात आला आहे.

### ७ जिल्ह्यांतून होणार ९ ड्रोनचे उड्डाण

पालघर जिल्ह्यातील शिरगाव, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गोराई, मुंबई शहर जिल्ह्यामधील ससून गोदी, रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा, साखरी नाटे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड या नऊ समुद्रकिनाऱ्यावरून ९ ड्रोन उडवले गेली.

यावेळी आमदार मनीषा कायंदे, कृषी व पदुम विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त पंकज कुमार, सागरी सुरक्षा पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, मत्स्य व्यवसाय उपायुक्त दिपाली बनकर, यासह सात ठिकाणी उपस्थित असलेले मत्स्य व्यवसाय विभागाचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## गोड गळ्याचे गायक; येसुदास

आज १० जानेवारी हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांची ८५ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# महामार्ग पोलीस मदत केंद्र मलकापूर यांच्यातर्फे
# रस्ता सुरक्षा सप्ताह २०२५ चे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : दिनांक ९ /०१/ २०२५ रोजी मा. श्री सुरेश मेकला. (अप्पर पोलीस महासंचालक वाहतूक ),महाराष्ट्र राज्य मुंबई,यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. श्री यशवंत सोळंके पोलीस अधीक्षक ,महामार्ग प्रादेशिक विभाग नागपूर ,यांच्या आदेशाने महामार्ग पोलीस मदत केंद्र मलकापूर यांच्यावतीने विविध ठिकाणी रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक संदीप इंगळे, पोउपनि गजानन उज्ञैनकर, शैलेश पवार, पोलीस अमलदार विठ्ठल काळुसे ,प्रवीण राणे ,विनोद राठोड ,गोपाल गोरले, मिलिंद ताकतोडे, विठ्ठल खोडे, दीपक पिटकर ,विष्णू गोलांडे, योगेश शेळके, गणेश सुसर, निवृत्ती सानप यामध्ये सर्वप्रथम नॅशनल हायवे क्रमांक ५३ येथे महामार्गाने जाणाऱ्या खाजगी बसेस व एसटी बसेस यांना रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त होणाऱ्या अपघाताबद्दल घेण्याबाबतचे विशेष काळजी व उपाय याबद्दल प्रवासी व चालकांना नियम समजून सांगितले.

तसेच हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग वर होणाऱ्या अपघाताबद्दल सुद्धा चालक व प्रवासी यांना वाहतूक नियमाबद्दलचे धडे देण्यात आले. व चिखली बस स्टॅन्ड व ट्रॅव्हल्स ऑफिस येथे सुद्धा भिंती पत्रके चिपकवण्यात आले. यावेळी खालील प्रमाणे वाहतूक नियम समजावून सांगितले.

१) अवजड वाहन नेहमी तिसऱ्या लाईन मध्ये चालवावे
२) वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करू नये.
३) कागदपत्रे नेहमी सोबत ठेवावी .
४) दारू पिऊन वाहन चालवू नये.
५) वाहन अतिवेगात चालू नये.
६) नेहमी ओव्हरटेक करताना उजव्या बाजूने करावे.
७) वाहन चालक यांनी वेग-मर्यादाचे पालन करावे.
८) विरुद्ध दिशेने वाहन चालू नये .
९) वाहन चालवताना वाहतूक चिन्ह पाहून त्या सूचनेप्रमाणे वाहन चालवावे.
१०) चार चाकी वाहन चालवताना नेहमी सीट बेल्ट वापरावे.
११) महामार्गावर धोकादायक परिस्थितीत कोणतेही वाहन थांबवू नये.
१२) वाहन चालवताना समोरील वाहनाच्या वेगाचा अंदाज घेऊन वाहन चालवावे. कारण समोरील वाहनाच्या वेगाचा अंदाज न आल्याने पाठीमागील वाहनाने समोरील वाहनाला धडक दिल्याने घडणाऱ्या अपघाताच्या प्रमाणांमध्ये वाढ झाली आहे.
१३) ज्या वाहनावर प्रलंबित दंड आहेत त्यांनी मपो केंद्राशी संपर्क साधून तात्काळ दंड भरून घ्यावा.

अशा प्रकारचे वाहतूक नियमाची अमलबजावणी व घडत असणाऱ्या अपघात बद्दल विशेष काळजी घेण्याचे आवाहन महामार्ग पोलीस मदत केंद्र मलकापूर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.




# वाढवण ते नाशिक हायस्पीड कनेक्टिविटी तयार करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील पायाभूत प्रकल्पांची कालमर्यादेत गतिमान उभारणी करा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :’राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांची गतिमान उभारणी करा. यात वाढवण ते नाशिक हायस्पीड कनेक्टिविटी तयार करा,’ असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये योग्य संतुलन राखत महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हाच राज्य सरकारचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून शासनाच्या धोरणांद्वारे विकासाची समान संधी सर्व भागांमध्ये निर्माण केली जावी, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मुख्यमंत्री वॉर रूम येथे उच्चस्तरीय बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्य सचिव सुजाता सौनिक, विविध विभागांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच प्रकल्पांशी संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला आणि त्यांना गती देण्याच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीला वेग देण्यासाठी आवश्यक निर्णय या आढावा बैठकीत घेण्यात आले.

पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर देशाच्या सागरी व्यापाराच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्याच्या उभारणीसाठी आवश्यक परवानग्या आणि भूसंपादन प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि निर्यात धोरणाला चालना देणारा ठरणार आहे.

तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचन सुविधांचा विस्तार करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या सर्वेसाठी सोमवारी कार्यआदेश देण्यात यावेत, लोअर पेंढी प्रकल्प ग्रस्तांना तातडीने जागा देण्यात यावी, असे निर्देशही यावेळी देण्यात आले. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, जलस्रोत व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार आहे. तसेच वर्धा - नांदेड रेल्वे मार्ग आणि वडसा - गडचिरोली प्रकल्पाचे भूसंपादन वेगवान करावे, तुळजापूर मंदिर विकास आराखडा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावा, छत्रपती संभाजीनगरच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्र्वभूमीवर आणि वाढती पाणी टंचाई लक्षात घेता जलपुरवठा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना आरओबीचा प्रश्न्न मार्गी लावावा आणि पहिला टप्पा ३१ मार्च पर्यंत सुरू करावा. विरार - अलिबाग मल्टी मॉडेल कॅरिडोरचे सर्वेक्षण पुढील महिन्यात पूर्ण करावे, जालना - नांदेड मुल्यांकनाचे प्रश्न्न तातडीने सोडवावेत, मुळा मुठा नदी संवर्धन जागेचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा. बीडीडी चाळ पुनर्विकास, वरळी ट्रान्झिट इमारत लवकर उपलब्ध करून द्यावी. मुंबई मेट्रो ३ जून जुलैपर्यंत पूर्ण करावा. वाढवण बंदरासाठीची संपूर्ण जागा ३१ मार्च पर्यंत देण्यात यावी आणि पालघर विमानतळासाठी सल्लागाराची नेमणूक करावी अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

मुंबईसह राज्यभरातील मेट्रो, रेल्वे, महामार्ग, विमानतळ, बंदरे, सिंचन, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पर्यटन यांसारख्या विविध क्षेत्रांतील एकूण १९ महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये निम्न पेडी सिंचन प्रकल्प, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना, विरार-अलिबाग मल्टीमोडल कॉरिडॉर, बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प, वांद्रे - वर्सोवा सि लिंक, ठाणे रिंग मेट्रो, ना.म. जोशी मार्ग, नायगाव, पुणे रिंग रोड, पुणे मेट्रो - ३ आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प आदी प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्र्यांनी प्रामुख्याने प्रशासकीय मान्यता, निधी वितरण, भूसंपादन, पुरवणी मागणी आणि कार्यवाही प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे तसेच प्रकल्पांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवण्यात यावी असे निर्देश दिले.

पुणे शहर आणि परिसरातील वाहतुकीच्या वाढत्या समस्येवर उपाय म्हणून पुणे रिंग रोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असून, त्याच्या भूसंपादन प्रक्रियेस गती देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पामुळे वाहतुकीचा ताण कमी होणार आहे आणि वेळेची व इंधनाची बचत होईल.

तसेच, श्री तुळजाभवानी मंदिर परिसर सुशोभीकरण योजनेद्वारे यात्रेकरूंसाठी अधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असून पर्यटन क्षेत्रासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच, वाढवण बंदर ते नाशिक मार्गाच्या विकासासाठी आवश्यक कार्यवाही करण्यासह वाढवण येथे नवीन विमानतळ उभारणीच्या शक्यतांचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याबाबत संबंधित विभागांना मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचेही आदेश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट निर्देश दिले की, प्रकल्पांच्या अंमलबजावणीत होणाऱ्या विलंबास संबंधित विभागांना जबाबदार धरले जाईल आणि आवश्यक ती तातडीची पावले उचलली जातील. यासोबतच, प्रत्येक प्रकल्पासाठी जबाबदारी निश्र्चित केली जाईल, जेणेकरून प्रकल्प वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होतील. संबंधित विभागांनी ठराविक कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा आणि त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि संसाधनांचा योग्य वापर करावा, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्यातील पायाभूत प्रकल्पांना गती देण्यामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला गती मिळेल, असा विश्र्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



## वाल्मिक कराडची बाजू का घेता? परभणीत लक्ष्मण हाकेंचा माईक हिसकावला, भाषण थांबवले

**परभणी/प्रतिनिधी** : बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण आणि परभणीती सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणावरुन जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून भावना व्यक्त केल्या जात आहेत. या जनआक्रोश मोर्चामध्ये आमदार सुरेश धस, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात भाषणेही केली जात आहेत. आरोपींच्या फाशीच्या शिक्षेची मागणी करत वाल्मिक कराड व मंत्री धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले जात आहेत. मात्र, आता या जनआक्रोश मोर्चाच्या विरोधात ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वात मोर्चे काढले जात आहेत. तसेच, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केल्यामुळे आमदार धस, अंजली दमानिया व मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध ह्या मोर्चातून आवाज उठवला जात आहे. मात्र, परभणी शहरात आज दलित कार्यकर्त्यांनी या मोर्चात लक्ष्मण हाकेंच्या हातातील माईक घेत त्यांचं भाषण थांबवल्याचं पाहायला मिळालं. वाल्मिक कराडचं समर्थन तुम्ही करत असून तुम्ही भाजपचं काम करता, असा आरोपही कार्यकर्त्यांनी केला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

परभणीत दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी आणि जेष्ठ नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवुन देण्यासाठी आंबेडकरी चळवळीकडून मागच्या २५ दिवसांपासून धरणे आंदोलन सुरु आहे. आज याच आंदोलनात ओबीसी नेते लक्ष्मण हाके आले होते. मात्र, यावेळी आंदोलक चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. आंदोलकांनी हाकेंचे भाषण थांबून तुम्ही वाल्मिक कराड यांची बाजू घेता, तुम्ही भाजपचे हस्तक असून आंबेडकरी जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप आंदोलकाकडून करण्यात आला.

दैनिक आपला विदर्भ

## विधिमंडळ सभागृहात नव्याने कार्यान्वित केलेल्या संगणक कार्यप्रणालीविषयी सदस्यांना सुयोग्य पद्धतीने अवगत करावे - विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी** : विधिमंडळ सभागृहात नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या संगणक कार्यप्रणालीविषयी सदस्यांना सुयोग्य पध्दतीने अवगत करण्यात यावे. सभागृह कामकाजातील सदस्यांचा सहभाग वाढावा यादृष्टीने सर्वोतपरी मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सदस्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांबाबत तत्परतेने कार्यवाही व्हावी,असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन, मुंबई येथे आज विधानमंडळ कामकाज आढावासंदर्भात सभापती प्रा. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्याप्रसंगी प्रा. शिंदे बोलत होते. यावेळी विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ (कार्यभार) जितेंद्र भोळे, सचिव-२ (कार्यभार) डॉ. विलास आठवले आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, बांधकाम सुरू असलेल्या नूतन मनोरा आमदार निवासचे बांधकाम सुरु झाले असून त्यामध्ये सभागृह, वाचनालय, अद्ययावत वाहनतळ, सुसज्ज भोजन कक्ष, सदस्य आणि सहायकांसाठीची प्रशस्त निवास व्यवस्था उपलब्ध असणार आहे. मॅजेस्टीक आमदार निवासचे देखील वारसा वास्तुवैभव कायम ठेऊन अतिशय देखणे असे नुतनीकरण करण्यात येत आहे. प्रामुख्याने पीठासीन अधिकारी यांच्या निवासासाठी मलबार हिल येथे अजिंठा इमारतीची सुसज्ज वास्तू उभारण्यात येत आहे. ही सर्व बांधकामे विहित मुदतीत पूर्ण व्हावीत आणि सदस्यांना तातडीने त्याचा लाभ प्राप्त व्हावा यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने उचित कार्यवाही करावी अशा सूचना विधानपरिषदेचे सभापती प्रा. शिंदे यांनी या बैठकीत दिल्या.

# नांदेड जिल्हयातही ‘मिशन १०० डे’; ७ कलमी कार्यक्रमाची धडाकेबाज अंमलबजावणी सुरु

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ७ कलमी कार्यक्रमाच्या ’मिशन १०० डे ’ अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या उपक्रमांतर्गत शंभर दिवसांत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा आणि गुंतवणूक प्रोत्साहन यावर भर दिला जाणार आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभाग प्रमुखांना प्रमुख मुद्द्यांवर काम करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत ७ जानेवारी रोजी आयोजित व्हिडिओ कॉन्फरन्सिंग नंतर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी लेखी आदेश दिले आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील सात सूत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**७ कलमी कार्यक्रमाचे मुख्य मुद्दे**

**१. वेबसाईट अद्यावत करणे**

जिल्ह्याच्या अधिकृत वेबसाईटचा दर्जा सुधारून ती माहितीपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांना ऑनलाइन सुविधांचा जलद लाभ घेता यावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. ज्या कार्यालयांच्या वेबसाईट आहेत त्या सर्व अपडेट करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**२. इज ऑफ लिविंग वाढविणे**

नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्यासाठी, विविध सेवांचे सुसूत्रीकरण व सरळीकरण करण्याचे आणि समस्यांवर सोयीस्कर उपाययोजना हाती घेतल्या जातील.

**३. कार्यालयीन स्वच्छता**

सुंदर माझे कार्यालय या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासनातील प्रत्येक कार्यालय स्वच्छ, सुटसुटीत आणि कार्यक्षम ठेवण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवली जाईल.

**४. तक्रार निवारण**

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी केली जाणार आहे. यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतींचा वापर केला जाईल. विशेषता यासाठी आपले सरकार पोर्टल, सीपी ग्राम व पीजी पोर्टल व इतर ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून तक्रारी निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**५. सोयीसुविधा वाढविणे**

नागरी सुविधा सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली जातील. शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणे कार्यालयातील स्वच्छतागृहे अद्यावत ठेवणे कार्यालयामध्ये अभ्यास कक्ष निर्माण करणे कार्यालय परिसराचे सुशोभीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे

**६. गुंतवणूक प्रोत्साहन**

जिल्ह्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि नवीन उद्योगांची स्थापना करण्यासाठी विशेष धोरणे आखली जातील. तातडीने सर्व परवाने संबंधितांना उपलब्ध होतील कुठेही अडवणूक होणार नाही याबाबत दक्ष राहण्याची सूचना त्यांनी केली आहे.



**७. क्षेत्रीय भेटी वाढविणे**

अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखून ठेवावे तसेच क्षेत्रीय भेटीमध्ये शासनाच्या महत्त्वकांक्षी व पथदर्शी योजनांचा आढावा घेण्याची निर्देश त्यांनी विभागप्रमुखांना दिले आहे.

**वेळापत्रक आणि प्रगती आढावा**

या कार्यक्रमाची सर्व अंमलबजावणी १५ एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. दरम्यान, ५० दिवसांनंतर या प्रकल्पाचा आढावा घेण्यात येईल. सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करत या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी शंभर दिवसाच्या कालमर्यादेत परिपूर्णतेचे आदेश दिले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महत्त्वाचे...

## ११ जानेवारीपासून वित्त व लेखा विभागाच्या विभागीय क्रीडा स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर विभागातील संचालनालय लेखाकोशागारे कर्मचारी कल्याण समिती मार्फत वित्त व लेखा विभागाच्या विभागीय क्रीडा स्पर्धा नांदेड येथे ११ जानेवारीपासून होत आहे.११ जानेवारीला सकाळी आठ वाजता सायन्स कॉलेज नांदेड येथे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या शुभहस्ते उद्घाटन समारंभ होणार आहे.

११ व १२ जानेवारी या दोन दिवसात विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन कुसुम सभागृह नांदेड येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण १२ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लेखा व कोषागारे विभागाच्या कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन लेखा व कोषागार विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## छात्र संसदेच्या विद्यार्थ्यांनी घेतली मंत्री अतुल सावे यांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशभरातील आयआयटी, आयआयएम, राष्ट्रीय विधी विद्यापीठ आणि इतर खाजगी विद्यापीठांमधून शिक्षण घेणाऱ्या छात्र संसदेच्या विद्यार्थ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांची मुंबईत भेट घेऊन विविध विषयांवर संवाद साधला.

यावेळी मंत्री श्री.सावे यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील कल्पना, त्यांचे प्रश्न जाणून घेतले व त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देवून ते म्हणाले, युवा पिढी हे राष्ट्राचे भवितव्य आहे, त्यांच्यातील जिज्ञासेला वाव देऊन त्यांच्यातील कौशल्य आणि गुणांना समृद्ध केले पाहिजे.यासाठी आपले सरकार सदैव प्रयत्नशील आहे. अपारंपरिक ऊर्जा या खात्याबद्दल विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर मंत्री श्री.सावे यांनी उत्तरे दिली व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

## मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ३१ जानेवारीपर्यंत सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, महामंडळे, महापालिका, तसेच २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या सर्व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन अ.मु. पवार, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर यांनी केले आहे.

कायद्यानुसार, सर्व नियोक्त्यांनी दर तिमाही अखेर (मार्च, जून, सप्टेंबर, डिसेंबर) मनुष्यबळाची माहिती ३० दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. विवरणपत्र सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५आहे.

विवरणपत्र सादर करण्याची प्रक्रिया :

– सदर विवरणपत्र महास्वयम वेब पोर्टलवर (https://rojgar.mahaswaym.gov.in) ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

– नियोक्त्यांनी पोर्टलच्या एम्प्लॉयर (List a Job) टॅबवर जाऊन आपले युजर आयडी व पासवर्ड वापरून लॉगइन करावे.

– ER-I रिपोर्ट पर्यायावर क्लिक करून त्रैमासिक विवरण ऑनलाईन सादर करावे.

ज्या नियोक्त्यांनी अद्याप महास्वयम पोर्टलवर नोंदणी केलेली नाही, त्यांनी तत्काळ पोर्टलवर नोंदणी करून आपल्या आस्थापनेची माहिती भरावी. अधिक माहिती किंवा तांत्रिक अडचणीसाठी mumbaicity.employmentgmail.com या ईमेलवर संपर्क साधावा. हे विवरणपत्र ऑफलाईन स्वीकारले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का; मुंबई उच्च न्यायालयाने 'ती' याचिका फेटाळली

**मुंबई/प्रतिनिधी :** महाविकास आघाडी सरकारच्या काळातील विधान परिषदेच्या राज्यपालनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीच्या शिफारशीची यादी शिंदे सरकारने मागे घेतली होती. याविरोधात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे कोल्हापूरचे नेते सुनील मोदी यांनी उच्च न्यायालयाचे दार ठोठावले होते. परंतु, ही याचिका आता मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि अमित बोरकर यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी ५ सप्टेंबर २०२२ मध्ये राज्यपालनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीच्या शिफारशीची यादी मागे घेतली होती. याविरोधात जुलै २०२३ मध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते सुनील मोदी यांनी जनहित याचिका दाखल केली. याप्रकरणी ७ ऑक्टोबर २०२४ रोजी उच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. परंतु, ही याचिकाच आता फेटाळून लावण्यात आली आहे.दरम्यान, १४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सात आमदार विधान परिषदेवर पाठवले होते. यावरही सुनील मोदी यांनी आक्षेप घेत दुसरी जनहित याचिका दाखल केली होती. या प्रकरणातील मागील याचिका निकालासाठी राखून ठेवलेली असताना राज्यपालांनी नवीन आमदारांची नियुक्ती करणे कायद्याच्या दृष्टीने द्वेषपूर्ण आहे, असा युक्तीवाद सुनील मोदी यांनी केला होता. दरम्यान, या दुसऱ्या याचिकेवर अद्याप सुनावणी झाली नसून त्यावर लवकरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.माविआ सरकारने विविध क्षेत्रातील १२ व्यक्तींची शिफारस तत्कालीन राज्यपाल भगतसिह कोश्यारी यांच्याकडे नोव्हेंबर २०२० मध्ये केली होती. त्यावर जवळपास अडीच वर्ष राज्यपालांनी कोणताही निर्णय घेतला नाही. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले तरीही निर्णय घेण्यात आला नाही. सत्तांतर झाल्यानंतर विद्यमान सरकारने प्रस्तावित नावे परत घेण्याच्या निर्णयाला विद्यमान राज्यपालांनी विरोध केला नाही.

# शेतकरी, युवकांना मिळणार ड्रोन प्रशिक्षणाची संधी

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या ड्रोन प्रशिक्षण योजनेची अंमलवजावणी करण्याच्या दृष्टीने बुलढाण्यात सुरु करण्यात आलेल्या ड्रोन तंत्रज्ञान कंपनी कॉनफ्लाय डायनॅमिक्स प्रा. लिमिटेडच्या प्रादेशिक कार्यालयाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते बुधवारी झाले. या कॉनफ्लाय डायनॅमिक्स कंपनीमार्फत जिल्ह्यातील शेतकरी, युवकांना ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

ड्रोनचे प्रशिक्षण, देखभाल व दुरुस्ती प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कॉनफ्लाय डायनॅमिक्सने बुलडाण्यात प्रादेशिक कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त गणेश विटोडे, प्र.जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, कॉनफ्लाय डायनॅमिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल कस्तुरे, मारुत ड्रोनटेकचे राष्ट्रीय फ्रँचायझी प्रमुख, संजय पाल, तसेच जिल्ह्यातील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला कारागीर उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना ड्रोन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इलेक्ट्रिक वाहन यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील विकासासाठी कसा उपयोग होऊ शकतो यावर भर दिला. त्यांनी ड्रोनचा उपयोग कीटकनाशक फवारणी, निरीक्षण आणि कृषी क्षेत्रातील इतर उपक्रमांसाठी वाढविणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली.

यावेळी कॉनफ्लाय डायनॅमिक्सचे सीईओ, कुणाल कस्तुरे यांनी प्रादेशिक कार्यालयातून सुरू होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यात एनएसडीसी किसान ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रम, ज्यामुळे शेतकऱ्यांना ड्रोनच्या प्रगत उपयोगाची माहिती मिळेल. दुरुस्ती आणि देखभाल प्रशिक्षण हे जे हैदराबादस्थित आघाडीच्या ड्रोन उत्पादन कंपनी मारुत ड्रोनटेकच्या सहकार्याने फ्रँचायझी स्वरूपात उपलब्ध असेल, असे त्यांनी सांगितले.

कॉनफ्लाय डायनॅमिक्सचे आगामी काळात प्रादेशिक कार्यालयाच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधन, आणि ड्रोन उत्पादनावर भर असणार आहे. स्थानिक तांत्रिक संस्थांना ड्रोन सेंटर ऑफ एक्सलन्स आणि कौशल्य विकास कार्यक्रम स्थापन करण्यात मदत करणार असल्याचे सांगितले. याची दखल घेत जिल्ह्यात नाविण्यपूर्ण उपक्रम, उद्योग सुरु करण्यासाठी प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहील असे जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वस्त केले.

यावेळी बोलतांना कुणाल कस्तुरे यांनी कंपनीच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. त्यांनी ग्रामीण भागात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान पोहोचविणे, स्थानिक लोकांना सक्षम करणे आणि प्रादेशिक स्तरावर कौशल्य विकासाला चालना देणे यावर भर असल्याचे सांगितले.

कौशल्य विकासाच्या दृष्टीने या प्रशिक्षण कार्यक्रमातून बुलडाण्यातील शेतकरी, कारागीर आणि युवकांना प्रगत तंत्रज्ञान व कौशल्य आधारित प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे मत यावेळी मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले.

## युझवेंद्र चहलसोबतच्या घटस्फोटावर अखेर धनश्री वर्मा बोललीच

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून अनेक कलाकार आणि सेलिब्रिटींनी घटस्फोट घेतला आहे. या यादीत हार्दिक पांड्या, मोहम्मद शामी, शिखर धवन यांसारख्या क्रिकेटपटूंच्या नावांचाही समावेश आहे. दरम्यान टीम इंडियाचा युवा ऑफ स्पिनर युझवेंद्र चहल गेल्या काही दिवसांपासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहे. युझवेंद्र चहल आणि पत्नी धनश्री वर्मा यांच्यात काडीमोड झाल्याची माहिती समोर येत आहे.

क्रिकेटर युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. दोघांमध्ये वाद सुरू असून दोघंही घटस्फोट घेणार असल्याच्या अफवा रंगल्या आहेत. लग्नाच्या ४ वर्षात दोघांमध्ये खटके उडण्यास सुरुवात झाली आहे. २०२० मध्ये युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्माने लग्नगाठ बांधली होती. आता लग्नाला ४ वर्ष झाली तर दोघांमध्ये भांडणं सुरू झाली आहे. दोघांनी इंस्टाग्रामवरून एकमेकांना अनफॉलो केलं आहे.

दोघांनी एकमेकांना अनफॉलो केल्यापासून आणि घटस्फोटाच्या अफवा रंगल्यापासून युझी क्रिप्टिक पोस्ट शेअर करत आहे. त्यामुळे या घटस्फोटाच्या चर्चेना आणखी हवा मिळत आहे. दोघांमध्ये खटके उडाल्याची माहिती मिळताच फॅन्सना चिंता लागून राहिलीये.

अशातच आता धनश्रीने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली असून या प्रकरणावर तिचं मत मांडलं आहे. तिने आपल्या इन्स्टा स्टोरीमध्ये म्हटलं आहे, गेले काही दिवस माझ्या कुटुंबासाठी आणि माझ्यासाठी खूप कठीण गेले आहेत.

# ८.०६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ ची परतफेड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.०६ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ अदत्त शिल्लक रकमेची दि. १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.




परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. ११ फेब्रुवारी , २०२५ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४(२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.०६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली., असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केलें जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे. रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोकऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे वित्त विभागाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

# मुंबई उपनगर जिल्ह्यातील ३३०० उमेदवारांचे कौशल्य वृद्धिंगत होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उपनगर जिल्ह्यातील वय वर्ष १८ ते ४५ वयोगटातील उमेदवारांचे कौशल्य वृद्धिंगत करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त करून देण्याकरिता किमान कौशल्य विकास कार्यक्रम सन २०२४ –२५ ही योजना, जिल्हा नियोजन समितीतर्फे कौशल्य विकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे. सन २०२४–२५ या कालावधीमध्ये जिल्ह्यातील ३३०० उमेदवारांचे कौशल्य वृद्धिंगत करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने अधिकृत संस्थांना तुकडी वाटप करण्यात आले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती मुंबई उपनगर तर्फे किमान कौशल्य विकास कार्यक्रम सन २०२४ –२५ तुकडी वाटपाकरिताची बैठक झाली. या बैठकीला उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा नियोजन अधिकारी संजय शिंदे, महासंचालक (प्रशिक्षण) (DGT) नरेशकुमार चव्हाण, सरकारी कामगार अधिकारी प्रेरणा मोहने, जिल्हा अग्रणी बँकचे युवराज शिंदे, एसएमइ चेंबर ऑफ इंडियाचे मनेश भगत इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

कृषी, एरोस्पेस अँड एवियेशन, ऑटोमोटिव, ब्युटी अँड वेलनेस, कॅपिटल गुड्स, बांधकाम, इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, जेम्स अँड ज्वेलरी, हेल्थकेअर, इन्स्ट्रुमेंट, आयटीआय, माध्यम आणि मनोरंजन, पर्यटन आणि आदरातिथ्य, ऊर्जा या क्षेत्रांमध्ये उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील दहिसर, बोरीवली, कांदीवली, मालाड, अंधेरी, गोवंडी, चेंबूर, मुलूंड, कुर्ला या भागातील प्रशिक्षण संस्थांमध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील रहिवासी व किमान दहावी व बारावी उत्तीर्ण असलेले उमेदवार या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. योजनेचा लाभ घेण्याकरिता उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर १७५, श्रेयस चेंबर्स, १ ला माळा, डॉ.डी.एन रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी क्र. (०२२–२२६२६४४०) येथे संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र शैलेश भगत यांनी केले आहे.

## वाल्मिक कराडप्रश्नी सुप्रिया सुळे आक्रमक; ईडी आणि पीएमएलएचा उल्लेख करत थेट केंद्र सरकारला केले लक्ष्य!

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलं आहे. या प्रकरणी वाल्मिक कराडला अटक झाली असून त्याच्यावर खंडणीअंतर्गतही गुन्हा दाखल झाला आहे. अंजली दमानिया, जितेंद्र आव्हाड आणि सुरेश धस यांनी हे प्रकरण उचलून धरल्यानंतर आता खासदार सुप्रिया सुळे यांनीही या प्रकरणातील एक वेगळाच मुद्दा उचलून धरला आहे. या मुद्द्यावर त्या थेट अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याशीही चर्चा करणार आहेत. आज सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणी आवाज उचलला. वाल्मिक कराडवर आधीच खंडणीअंतर्गत गुन्हा दाखल होता. खंडणीविरोधात पीएमएलए कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला जातो. मग वाल्मिक कराडप्रकरणी ईडी आणि पीएमएलएची अंमलबजावणी का करण्यात आली नाही, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी राज्य आणि केंद्र सरकारला विचारला.

# मृदा शास्त्रज्ञ डॉ. रंजन पाल यांच्या मार्गदर्शनात माती परीक्षण

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप





१० जानेवारी शेतीचे सविस्तर मृदा सर्वेक्षण

**बिबी :** लोणार तहसीलमधील किनगाव जट्टू, खंडाळा, बिबी आणि चिखला या चार गावांमध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (झचघडध) २.० अंतर्गत जमिनीचे काम सुरू आहे. डॉ. रंजन पॉल, खउ–ठ–नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सर्व्हे अँड लँड युज प्लॅनिंग, नागपूर (कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय) मधील मृदा शास्त्रज्ञ डॉ. रंजन पॉल यांच्या नेतृत्वाखालील या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट सरकारी धोरण–निर्धारण आणि कृषी क्षेत्रात मदत करण्यासाठी माती डेटा गोळा करणे आहे.

सर्वेक्षणादरम्यान, डॉ. रंजन पॉल यांच्यासह रोशन अरविंद कडू आणि त्यांच्या टीमने मातीच्या क्षितिजाचे परीक्षण करण्यासाठी आणि प्रयोगशाळेच्या विश्र्लेषणासाठी नमुने गोळा करण्यासाठी निवडलेल्या ठिकाणी ५५ फूट खड्डे खणले. या नमुन्यांचे विश्र्लेषण नागपुरातील खउ–ठ–छइडड आणि डणझ प्रयोगशाळेत केले जाईल जेणेकरून मातीचे वर्गीकरण आणि कृषी पिकांच्या वाढीसाठी महत्त्वाच्या असलेल्या मातीच्या इतर गुणधर्मांचे वर्णन करणाऱ्या मृदा संसाधनांवर तपशीलवार अहवाल तयार केला जाईल.

या भागातील मातीचे स्वरूप समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण महत्त्वाचे आहे. एकदा विश्र्लेषण पूर्ण झाल्यावर, एक सर्वसमावेशक अहवाल सरकारला सादर केला जाईल, जो धोरणांचा मसुदा तयार करण्यात आणि शाश्र्वत जमीन वापरासाठी पुढाकार घेण्यास मदत करेल डॉ. पॉल म्हणाले.

हे सर्वेक्षण झचघडध २.० अंतर्गत कार्यक्षम संसाधन व्यवस्थापन आणि शाश्र्वत कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या ध्येयाचा एक भाग आहे. स्थानिक शेतकरी आणि अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे आणि आशा व्यक्त केली आहे की निष्कर्ष सुधारित कृषी उत्पादकता आणि प्रदेशासाठी दीर्घकालीन फायद्यासाठी योगदान देतील.

सर्वेक्षण केलेल्या गावांमध्ये सिंचनाच्या पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी, मातीची गुणवत्ता, आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्र्वत शेतीला चालना देण्यासाठी या वैज्ञानिक प्रयत्नातून मौल्यवान अंतर्दृष्टी मिळण्याची अपेक्षा आहे.

# केस गळती प्रकरण; बाधीत गावांतील पाणी पिण्यास, वापरण्यास अयोग्य

## पाणी न वापरण्याचे प्रशासनाचे आवाहन; अफवावर विश्वास ठेवू नका- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यातील काही गावांमध्ये मागील काही दिवसापासून केस गळतीच्या समस्या नागरिकांमध्ये आढळून आल्या. यासंदर्भात आरोग्य विभागाने तपासणी केले असता या गावातील बोअरवेल व विहिरीचे पाणी पिण्यास व वापरण्यास अयोग असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहे. त्यानुसार प्रशासनाने केस गळती होणाऱ्या गावांतील पाणी पिण्यास किंवा उपयोगात आणु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

शेगांव तालुक्यातील कालवड, बोंडगाव, कठोरा, भोनगाव, हिंगणा वैजिनाथ, बुई, माटरगाव, पहुजीरा व निंदी या गावांमध्ये केस गळत असल्याचा प्रकार समोर आला. त्यानंतर प्रशासनाने तातडीने आरोग्य विभागाचे पथक पाठवून सर्वेक्षण करुन बांधीताची तपासणी व चाचण्या करुन कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच काही नागरिकांचे स्कीन बायपसी टेस्टींग (ड्ढ्ढळप इर्ळ्रीू ढ्ढीींळपस) व पाण्यामधील हेवीमेटल्स आरसेनिक व लीड याची तपासणी करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. त्वचारोग तज्ज्ञ यांनी रुग्णांची पाहणी करून प्राथमिक निदान फंगल इन्फेक्शन असु शकते व त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र येथे लक्षणे पाहुन उपचार सुरु केले आहे. जवळपासच्या तक्रार आलेल्या गावात आरोग्य पथक घरोघरी जावुन सर्वे करित आहे. जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार अकोला येथील वैद्यकीय महाविद्यालयातील विशेष पथक तसेच राज्यस्तरावरुन सुद्धा वैद्यकीय पथक बाधीत गावात भेट देणार आहे.



बाधीत गावात झालेले केस गळती ही कोणत्याही व्हायरसमुळे झाले नसल्यामुळे नागरिकांनी घाबरुन जाऊ नये किंवा अफवावर विश्र्वासू ठेवू नये, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

बाधीत गावांमधील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत वारी हनुमान येथील धरणातून होत असून येथील पाणी पिण्यास योग्य असल्याचा अहवाल प्राप्त आहे. तथापी, बहुतांशी गावामध्ये वापरण्याच्या पाण्याचा स्त्रोत बोअरवेल किंवा विहिर असून हे पाणी वापरण्यास अयोग्य असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. या पाण्यामध्ये नायट्रेट व टिडिएस प्रमाणाबाहेर असल्याचे दिसून येते. त्वचारोग तज्ञांनी सुचविल्यानुसार पाण्यामध्ये आरसेनिक व लीड या हेविमेटल्सची तपासणी करणे गरजेचे असल्याने बाधीत गावांतील पाण्याचे नमुने नागपुर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्वचेचे व पाण्याचे नमुने अहवाल प्राप्त होण्यास पुढील आठ ते दहा दिवस लागणार आहेत. त्यामुळे बाधीत गावातील नागरिकांनी अयोग्य असलेले पाणी पिण्यास किंवा ईतर उपयोगास आणु नये, असे अवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

## भोज नगर तांडा येथील हातभट्टी दारूवर छापा मारून ७४,००० रुपयाची दारू व मोह सडवा माच केला नष्ट



दैनिक आपला विदर्भ

### बिटरगाव ( बु ) ठाणेदार संतोष मनवर यांची धाडसी कारवाई

**उमरखेड/प्रतिनिधी :** बटरगाव ( बु ) येथील गट ग्रामपंचायत असलेला भोज नगर तांडा येथे गेल्या कित्येक वर्षापासून हातभट्टी गावठी दारूचा महापूर चालू आहे. व या गावठी दारू मध्ये रासायनिक नशिलेद्रव्य टाकून विक्री केल्या जात आहे. अशी गोपनीय माहिती गावकऱ्यांनी ठाणेदार साहेबांना दिली असता. आज ९ जानेवारी रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारात भोजनगर तांडा येथे अचानक छापा मारला. त्या वेळेस बाबू फुला राठोड याच्या घरी ५०० लिटर मोह सडवा माच तर २० लिटर दारू मिळवून आली. व बिरबल गणेश राठोड याचे घरी ८०० लिटर मोह सडवा माच तर २० लिटर गावठी दारू सर्व अंदाजे ७४,००० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. मोह सडवा माच व गावठी दारू खड्डे करून जमिनीत टाकून नष्ट करण्यात आली. या दोघांविरुद्ध ६५ ई व ६५ फ महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार कार्यवाही करण्यात आली.

ही कार्यवाही मा. कुमार चिंता सा. पोलीस अधिक्षिक यवतमाळ, मा. पियुष जगताप सा. अप्पर पोलीस अधीक्षक यवतमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार संतोष मनोहर साहेब यांनी केलि. यावेळेस उपनिरीक्षक शिवाजी टीपूर्णे, जमादार रवी गीते, जमादार रोशन सरनाईक, जमादार अर्जुन राठोड, देविदास हाके, दत्ता कवडेकर पोलीस शिपाई हजर होते.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** बाल आनंद मेळावा साजरा करण्या अगोदर राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मा साहेब व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पूजन करून सुरुवात केली.

म`हक र तालुक्यातील बेलगाव जिल्हा परिषद शाळेत शाळेतील विद्यार्थ्यां व विद्यार्थीना विविध खाद्य पदार्थाची स्टॉल लावून बाल आनंद मेळावा साजरा केला कमाई सप्ताहा अंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच व्यवहारिक. आर्थिक बाबीची जाण व्हावी समाजाचे ज्ञान मिळावे बिन भिंतीच्या शाळेतील ज्ञान प्राप्त व्हावे व्यवहार कुशलता कळावी यासाठी जिल्हा परिषद शाळेने खरी कमाई योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांच्या बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होती.

यावेळी शाळेतील विद्यार्थिनी स्वतःच्या घरून चविष्ट चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले होते स्टॉलची मानवी विविध पदार्थाची विक्री खरेदी व विविध पदार्थाचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला आनंद मेळाव्याला चिमुकल्या पासून ते अबाल उद्धानी नवयुवक व महिलांनी या मेळाव्या तर हजेरी लावली होती.

विद्यार्थ्यांनी आलेल्या सर्व खाद्यपदार्थाची गावकऱ्यांनी अतिशय उत्साह खरेदी केल्या व खाद्यपदार्थाची विक्री झाल्याने चिमुकल्याच्या चेहऱ्यावरचा आनंद ओ सांडून वाहत होता



विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करून विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील अंगीकृत स्तुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक श्री खवाल सर तसेच शाळेतील शिक्षक शिक्षिका वुंद यांच्या परिश्रमाने व गावातील नागरिक यांच्या सहकार्याने बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडतो.

## उत्कृष्ट पत्रकारिता साठी अशोक गायकवाड, कैलास घुगरे व विजय कदम यांना 'पुरस्कार' देऊन सन्मानित

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** :उमरखेड तालुक्यातील पत्रकार अशोक गायकवाड, कैलास घुगरे व विजय कदम यांना पत्रकारिता च्या क्षेत्रा मध्ये उत्कृष्ट योगदानासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र कडून ' पुरस्कार ' देऊन सन्मानित करण्यात आले . त्यांना हे सम्मान वसंतराव नाईक स्मृती सभागृह वनमाती नागपूर अधिवेशन आयोजित येथे भव्य कार्यक्रमा मध्ये युवा ग्रामीण पत्रकार संघ राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार आणि संघटनेचे पदाधिकारी यांच्याकडून देण्यात आले.



## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

दैनिक आपला विदर्भ

**बिबी :** स्थानिक दुसर बीड दि .०९ राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ अमरावती अंतर्गत व नारायणराव नागरे महाविदयालय दुसरबिड यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या दत्तक ग्राम वर्दडी खुर्द / दुसरबिड येथे ०९ जानेवारी २०२४ रोजी धीींह त्री चू इहरीरीं, धीींह त्री उळसळींरश्र डळींशीरलू ( माझ्या भारतासाठी युवा व डिजिटल साक्षरतेसाठी युवक) या अंतर्गत आज शिबिराचा शेवटचा दिवस म्हणजेच शिबिर समारोप.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य (सं गा बा अ वि ) प्राचार्य डॉ




. विजय नागरे हे होते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सात दिवसीय राजकीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये ज्या प्रकारचे विविध कार्यक्रम राबवले त्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सात दिवस हे बौद्धिक सत्र तसेच श्रमदान व विविध प्रबोधन शिबीर प्रबोधन रॅली तसेच स्वच्छता या प्रकारच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली व एन .एस .एस. बद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जनजागृती करण्याचे कार्य त्यांनी केलेल्या सात दिवशीय कार्यक्रमांमध्ये ग्राम वर्दडी खुर्द या परिसरामध्ये केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा. रमेश दादा कायंदे (सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी) तसेच बबनरावजी नागरे सर (सेवानिवृत्त शिक्षक), मा . प्राचार्य डॉ . राजेंद्र बोरसे (भगवान बाबा महाविद्यालय लोणार), मा. शिवराज कायंदे ( सचिव भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा) तसेच विद्यार्थी पालक विकास केदार हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तसेच यानंतर या शिबिरामध्ये सात दिवसात विद्यार्थ्यांना जे अनुभव आले त्यापैकी स्वयंसेविका अश्र्विनी नागरे व प्रेरणा नागरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ईश्वरी बरांडे या विद्यार्थीने केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका नैना गवारे मॅडम यांनी प्रास्ताविकेत सांगितले की विविध ठिकाणी गरजेनुसार शोषखड्डे खोदण्यात आले यानंतर समाज मंदिराच्या भोवतालचा परिसर स्वच्छ करण्यात आला तसेच त्याच्या जवळ वृक्षारोपणासाठी खड्डे खोदण्यात आले रोज सकाळी प्रार्थना व योगासने घेण्यात आली त्यानंतर ९ ते १२ या वेळेत गावकऱ्यांशी चर्चा करून विविध ठिकाणी साफसफाई केली तसेच जनजागृती करण्यात आली.या कार्यक्रमाला प्रा. डॉ. गणेश घुगे, प्रा .देवानंद नागरे, प्रा. मिलींद गवई, प्रा. जगदीश यादव प्रा. शंकर मेहेर प्रा. गजानन राठोड प्रा. महेश कायंदे प्रा. सत्यम श्रीवास्तव हे सुद्धा उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे आभार स्वयंसेविका कल्याणी सानप हिने व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### राष्ट्रीय युवा दिनानिमित्त शेगांव येथे सामूहिक सूर्यनमस्कार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिनाच्या औचित्याने संतनगरी शेगांव येथे रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ वाजेदरम्यान मथुरा लॉन्स शेगाव येथे सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषद, तालुका क्रीडा अधिकारी आणि कस्तुराई बहुउद्देशीय संस्था शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक सूर्यनमस्कारांचे आयोजन होणार आहे. सूर्यनमस्कार हा सर्वांगीण व्यायाम असून बालकांपासून वृद्धांपर्यंत करता येणारा सर्वश्रेष्ठ सर्वांगीण व्यायाम आहे. नियमित १२ सूर्यनमस्कार घातले तर अनेक आजारांपासून आपण दूर राहून उत्तम आरोग्य प्राप्त करू शकतो. नागरिकांनी या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्या आरोग्याविषयी सजग राहावे. सामूहिक सूर्यनमस्कार शेगाव येथील लावंण्या योगा स्टुडिओ मधील बालयोग साधक १०८ सूर्यनमस्कार घालून योगा विषयी जनतेमध्ये जनजागृती करणार आहेत. शेगाव वासियांसाठी ही अतिशय प्रेरणादायी बाब असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पतंजली प्रांतसह कोषाध्यक्ष पी. आर. सुलताने, जायंट्स ग्रुप फेडरेशन अध्यक्ष विनायक जी भारंबे,कस्तुराई बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष कालींदी असंबे व जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे.

### राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त वाहतुकीत बदल; पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी ::** सिंदखेड राजा येथे १२ जानेवारी रोजी श्री. राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा मोठया प्रमाणावर साजरा होतो. त्याअनुषंगाने या ठिकाणी कायदा व सुववस्थेच्या प्रश्र्न निर्माण होऊ नये याकरीता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३(C) पुणे-नागपूर वरील व राज्य महामार्ग क्र.५१ सिंदखेडराजा-देऊळगाव राजावरील जड वाहतुक दि. ११ जानेवारीचे रात्री १ वाजेपासून ते दि. १२ जानेवारीचे रात्री १२ वाजेपावेतो पर्यायी मार्गाने वळविण्याबाबत आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.



सध्याचा प्रचलित मार्ग जालना-सिंदखेडराजा-मेहकर ऐवजी पर्यायी मार्ग जालना-देऊळगाव राजा-चिखली-मेहकरचा वापर करावा. तर मेहकर-सिंदखेडराजा-जालना ऐवजी पर्यायी मार्ग मेहकर-चिखली दे.राजा-जालना या मार्गाचा वापर करावा. तसेच देऊळगाव राजा ते सिंदखेड राजा- सिंदखेड राजा ते देऊळगांव राजा या मार्गावरील जड वाहतुक बंद ठेवण्यात आले आहे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे निर्दर्शनास आल्यास मुंबई पोलीस वाहतुक अधिनियम १९५१ चे कलम १३१ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

### सावधान! निंगनूर भागात बिबट्याचा वावर; नागरिकांना खबरदारीचे अहवान



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :**उमरखेड तालुक्यातील निंगनूर गावा पासून दोन किलोमीटर च्या अंतरावर मंगळवारी दिनांक ७ च्या रात्री अकरा वाजताच्या सुमारास मुंडे च्या शेता जवळी रोड च्या साईड ने बिबट्याचे दर्शन झाले. त्यामुळे परिसरातील गावातील लोकांना या रस्त्यावर ये जा करताना खबरदारीचे आवाहन करण्यात येत आहे. मंगळवारी शकील ड्राइवर हे चार चाकी वाहनाने ढाणकी येथे आपल्या घरी परत येत असताना उमरखेड तालुक्यातील निंगनूर गावा पासून दोन किलोमीटर च्या अंतरावर मंगळवारी दिनांक ७ च्या रात्री अकरा वाजताच्या सुमारास मुंडे च्या शेता जवळी रोड च्या साईड ने बिबट्या हा प्राणी लपून शिकार खात असताना दिसला तेव्हा त्यांनी त्याचे चित्रफीत करून सोशिअल मीडियावार प्रसारित करत या रोडने प्रवास करणाऱ्या लोकांना खबरदारी करताना दिसत आहे.